Form II

तयार केला तो खालील प्रमाणे.

सदरचे घटनास्थळ हे सुपलकमी कॉरन् नाका पासुन अंदाजे पश्चिमेस 500 मिटर अंतरावर रामटेक ते मौदा जाणाऱ्या डांबरी रोडवरील असुन सदर रोड हा अंदाजे 20 फुट रुंदीचा असुन घटनास्थळी रोडवर रक्त पडलेला डाग दिसत असुन घटनास्थळी अपघातात मधील मो.सा. चे इंडिकेटरचे काचेचे बारीक तुकडे पडलेले दिसत आहे. घटनास्थळा पासुन पश्चिमेस अंदाजे 20 फुट अंतरावर ईलेक्ट्रीकचा सिमेंट पोल असुन त्या पोल पासुन अंदाजे पश्चिमेस 10 फुट अंतरावर एक ईलेक्ट्रीकचा सिमेंट पोल आहे. दोन्ही पोल वरुन विद्युत वाहिनीचे तार दिसत आहे. सदरील फिर्यादी हा त्याचा भाऊ चंद्रशेखर बबनराव भिवगडे हा मो.सा. क्र. MH-40-U-1594 वर नगरधन येथुन नेरला येथे जात असता घटनेची त्याचे मो.सा.ला कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक मारली त्यामुळे तो गंभीर जखमी होऊन मरण पावला आहे. ती हीच जागा आहे असे तो पंचासमक्ष घटनास्थळ दाखवुन सांगत आहे. सदर घटनास्थळाचे पुर्वेला पाहता तुकेश मधुदयाराम मनकबार रा. नांदापुरी यांचे शेत असुन पश्चिमेस मदनकर रा. नगरधन यांचे शेत आहे. तसेच उत्तरेस रामटेक कडुन येणारा डांबरी रोड असुन दक्षिणेस मौदा कडे जाणारा डांबरी रोड आहे.

सदर घटनास्थळ पंचनामा पंचासमक्ष सत्य व दिसल्या परिस्थीत्या तयार केला असुन पंचांनी वाचुन बरोबर असल्याची खात्री करुन सह्या केल्या आहेत.